खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## द्वितीय वर्ष कला (SYBA)

## मराठी (जी - २)

## सत्र चोथे

## मराठी साहित्य : भाषिक कौशल्यविकास आणि आधुनिक मराठी

## साहित्यप्रकार : ललितगद्य (CC-1 D(3)A)

SANJAY MAR HRM

## घटक २) 'साहित्यरंग' पाठ्यपुस्तक

# लेख ३) अरणी : मारुती चितमपल्ली

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

## ‘साहित्यारंग’ पाठ्यपुस्तक

# ३) अरणी : मारूती चितमपल्ली

### लेखक परिचय

**मारुती चितमपल्ली हे भारतीय पक्षीतज्ज्ञ व वृक्ष अभ्यासक. त्यांनी वन्य-जीवन व्यवस्थापन, वने, वन्यप्राणी आणि पक्षीजगताविषयी उल्लेखनीय संशोधन केले आहे.** 'पक्षी जाय दिगंतरा', 'जंगलाचं देणं', 'रानवाटा', 'शब्दांचं धन', 'घरट्यापलिकडे', 'पाखरमाया', 'निसर्गवाचन', 'आपल्या भारतातील साप' 'आनंददायी बगळे', 'निळावंती', 'पक्षिकोश', 'चैत्रपालवी', 'केशरचा पाऊस', 'चकवाचांदणं एक वनोपनिषद' इत्यादी अनेक ग्रंथांचे लेखन केलेले आहे. सोलापूर येथे भरलेल्या ७९ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे (२००६) अध्यक्षपदही भूषविले आहे.

**'अरणी' हा मारुती चितमपल्ली यांचा ललितलेख आहे. हा लेख वाचकाला थेट जंगलात घेऊन जाऊन, जंगलाच्या अपरिचित दुनियेची ओळख करून देतो. 'अरणी' नावाची आदिवासी तरूणी वुड्स या इंग्रज अधिकाऱ्याला जंगल वाढवण्यासाठी कशी मदत करते, जंगलातील आणि गुपिते त्याला कशी सांगते, याची मिहिती या लेखातून मिळते.**

### या लेखाचा आशय :

**‘अनेमले’ या पर्वतावरील ‘अरणी’ या आदिवासी मुलीची** ही कथा आहे. **‘अनेमले’ हा तमीळ शब्द असून त्याचा अर्थ 'हत्ती'** असा होतो. या पर्वत परिसरात हत्तींची संख्या अधिक. हत्ती या परिसरातील रोपवनाची नासधूस करीत होते. या पार्श्वभूमीवर अनेमले पर्वतावर सागवानाची लागवड करण्यासाठी इंग्लंडहून भारतात आलेले **वुड्स नावाच्या अधिकाऱ्याची** निवड झाली. तो मद्रासमार्गे या जंगलात पोचला. तेथील जुन्या निवासस्थानाची साफसफाई करून तेथे तो एकटा राहू लागला. तेथेच **सागवानाची रोपवाटिका** तयार केली.

या जंगलातील आदिवासी स्वच्छंदपणे शिकार करून, कंदमुळे खाऊन गुजरान करीत होती. हे आदिवासी रोपवनाच्या कामासाठी वुड्सला मदत करीत नव्हते. परिणामी त्याला रोपवनासाठी मजूर मिळत नव्हते. **मग वुड्स**



SANJAYMARHRM

**आदिवासींच्या सुख दुःखामध्ये जाणीवपूर्वक सहभागी होऊ लागला. मलेरियासारख्या साथीच्या रोगांवर त्यांना** औषधे देऊ लागला. आदिवासी लोक सेवा करणाऱ्याच्या ऋणात राहतात. त्यांनाही वुड्सबद्दल प्रेम वाटू लागलं. त्याच्या सांगण्यावरून आदिवासी बायकामाणसं जंगलात कामाला येऊ लागली. शंभर-दीडशे एकरातील झाड तोडून साफसूफ करण्यात आली. पावसाळ्याच्या सुरुवातीला साग लागवडीची तयारी केली. पावसाच्या पाण्याने रोप वाढू लागली. पण रोपाबरोबर गवतही वाढले. आदिवासी मजूर मदतीला धावले. गवत कापून काढले. मात्र **हत्तींनी छातीएवढी वाढलेली अनेक रोपे सोंडींनी उपटून टाकली.** मोठ्या कष्टाने आणि अपत्यप्रेमाणे उभे केलेले बाल-वन डोळ्यासमोर नष्ट होताना पाहून वुड्सला खूप दुःख झालं. पुन्हा पुढच्या वर्षी रोपांची लागवड करायचे ठरवून तो तिथेच जंगलात राहू लागला.

जंगलातील त्याच्या बंगल्याभोवती जंगलातील प्राणी ठिय्या देत. **वानरे बागेत हिंडायची**. फिरायची. **वाघीण आपल्या पिलांसोबत मनसोक्त खेळायची**. **अस्वलांची जोडी** तर बंगल्याभोवती फिरायची. खिडकीतून आत डोकावयाची. **खंजन पक्षी बागेत** शेपटी उडवीत चरू लागला की पावसाळा संपल्याची वुड्सला जाणीव व्हायची. पुन्हा रोपांच्या लागवडीसाठी तो प्रयत्न सुरू करायचा. उदरनिर्वाहासाठी महिन्यातून कधी तरी **'पोलाची'ला बैलजोडीने जाई** आणि आवश्यक साहित्य घेऊन येई.

एके दिवशी सकाळी वुड्सच्या बंगल्यासमोर **नाग आणि मुंगसाची** लढाई झाली. कितीतरी वेळ चाललेल्या संघर्षात नागाने मुंगसाला दंश केला. मुंगूस जंगलात पळाला. त्याच्यापाठोपाठ दुर्बीण घेऊन वुड्स त्याला शोधत गेला; मुंगूस काय करतो याच्या उत्सुकतेपोटी! **मुंगसाने कंदमूळ काढले.** ते खाल्ले. काही वेळ दगडावर पडून राहिला आणि जंगलात निघून गेला. वुड्सने त्या कंदमूळाचा नमुना **मद्रासला गॅम्बल या वनस्पतीशास्त्रज्ञाला** पाठविला. संशोधनानंतर त्या वनस्पतीच्या मुळ्या सर्पदंशावरील इलाजासाठी रामबाण औषध म्हणून वापरण्यात येईल, असा निष्कर्ष निघाला. **त्या वनस्पतीचे नाव होतं सर्पगंधा !**

वुड्स जंगलात एकटाच राहायचा. त्याला कशाचीच भीती वाटत नव्हती. त्यामुळे आदिवासींना तो जादूगार असल्याचे भासे. एक दिवस वुड्सकडे **'अरणी' नावाची आदिवासी मुलगी** हरणाचे जखमी पाडस घेऊन आली. जखमी पाडसाच्या चौकशीसाठी ती नियमित वुड्सकडे येऊ लागली. सहवासाचे रूपांतर प्रेमात झाले आणि पुढे



SANJAY MAR HRM

कोईमत्तूरच्या चर्चमध्ये **वुड्स आणि अरणीचा विवाह** झाला. वधूवरांना शुभाशीर्वाद देण्यासाठी प्रसिद्ध **वनस्पतिशास्त्रज्ञ गॅम्बल उपस्थित होते. त्यांनीच पुढे 'फ्लोरा ऑफ मद्रास' हा वृक्षांविषयीचा ब्रहतग्रंथ लिहिला.**

**अरणी व वुड्स बंगल्यात राहू लागले. तो अरणीची भाषा शिकला. तिच्याकडून पशुपक्ष्यांविषयाचे उपजत ज्ञान समजून घेतले हत्तींचा मृत्यू कसा होतो हे जाणून घेतले. वयस्कर हत्ती नदीत स्वत:ला कसा बुडवून घेतो, हे हत्तीडोहाचे रहस्य तिने वुड्सला सांगितले. वुड्सनेही शेवटपर्यंत ते रहस्य स्वत:पाशी ठेवले.**

पुन्हा पावसाळा तोंडावर आल्यावर सागवानाची लागवड केली. साग बहरू लागले. आता सागाची राखण करणे, वुड्सबरोबर अरणीचीही जबाबदारी झाली. तिला तिच्या वडिलांनी सांगितले होते, **की हत्ती हे उंटाला घाबरतात.** या माहितीनुसार वुड्सने मद्रासवरून दोन उंट आणले. आता ते दोघेजण उंटावरून रात्रीची गस्त घालू लागले. लागवडीची राखण करू लागले. त्या युक्तीमुळे लागवडीला यश आले.

**निसर्गाविषयी वुड्सला जिज्ञासा होती. निसर्गातील पशुपक्ष्यांची रहस्य त्याने अरणीकडून जाणून घेतली.** अरणीने तिला अवगत असलेल्या सर्व युक्ती त्याला सांगितल्या. मात्र एक दिवस सकाळच्या प्रहरी प्रचंड गजराजाच्या मागून वुड्सला सोडून अरणी जंगलात गेली.... कायमची !

**अशाप्रकारे 'अरणी' हा लेख आपल्याला जंगलाची सफर घडवून आणतो. जंगलातील अनेक नव्या गोष्टी आपल्याला समजतात. या लेखातील 'अरणी' या आदिवासी तरुणीकडून वुड्स या इंग्रज अधिकाऱ्याला जंगलातील अनेक नव्या रहस्यांचा शोध लागतो. हत्ती, हस्तिदंत, रानटी हत्तीचा नैसर्गिक मृत्यू, साप चावलेल्या मुंगसाचे विशिष्ट कंद खाणे इत्यादी नाविन्यपूर्ण अनुभव, स्वानुभवातून सूक्ष्म निरीक्षण, चतुरस्त्र आकलन, शास्त्रीय दृष्टिकोन, सहज सुलभ कथनपद्धती, प्रभावी प्रसंग-व्यक्तिरेखाटन अशा अनेकविध वैशिष्ट्यांमुळे या लेखातून समृद्ध अनुभवाचा प्रत्यय येतो.**

---

**अध्यापन साहित्य निर्मिती :**
**डॉ. संजय शिंदे , हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**संदर्भ ग्रंथ :**

१) **साहित्यरंग : डॉ. शिरीष लांडगे व इतर (संपादक)**



SANJAY MARKIPM